23 JUL 2025

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाचा डी.वाय. पाटील शिक्षण संस्थेसमवेत महत्त्वपूर्ण करार

## शैक्षणिक व आरोग्य संशोधन आणि सेवाविषयक आदानप्रदान होणार



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ आणि डी. वाय. पाटील शिक्षण संस्था यांच्यादरम्यान शनिवारी शैक्षणिक व आरोग्य क्षेत्रातील संशोधन आणि सेवा यांचे आदानप्रदान करण्याच्या अनुषंगाने एक महत्त्वपूर्ण सामंजस्य करार करण्यात आला. शिवाजी विद्यापीठ आणि डी. वाय. पाटील रिसर्च सेंटर व हॉस्पिटल यांच्या दरम्यान पाच वर्षांपूर्वी आरोग्य सेवांचे आदानप्रदानविषयक सामंजस्य करार करण्यात आला होता. या कराराची यशस्विता पाहून आता त्याची व्याप्ती वाढवित डी. वाय. पाटील शिक्षण संस्थेसमवेत पुढील पाच वर्षांसाठी सामंजस्य करार करण्यात आला आहे. शनिवारी या करारावर शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील आणि डी. वाय. पाटील शिक्षण संस्थेचे कुलगुरू डॉ. राकेशकुमार शर्मा यांच्या प्रमुख उपस्थितीत स्वाक्षरी करण्यात आल्या.

यावेळी कुलगुरू डॉ. शर्मा म्हणाले, शिवाजी विद्यापीठ आणि डी. वाय. पाटील शिक्षण संस्था या दोहोंची शैक्षणिक व संशोधकीय प्रगती एकसारख्या गतीने सुरू आहे. पूर्वीच्या सामंजस्य कराराचा दोन्ही बाजूंना अतिशय चांगला लाभ झाला आहे. कराराची व्याप्ती वाढल्यामुळे येथून पुढील काळात वैद्यकीय सेवांच्या पलिकडे इतरही विविध विभागांमध्ये सहकार्यवृद्धी करता येणे शक्य होईल. विद्यार्थ्यांचे आदानप्रदानही सुलभ होईल. परस्पर सहकार्यातून आपण एकत्रित वृद्धिंगत होऊ, अशी आशा त्यांनी व्यक्त केली.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, या सामंजस्य कराराची व्याप्ती आता व्यक्तींकडून संस्थांकडे सरकली आहे. शिवाजी विद्यापीठात सूक्ष्मजीवशास्त्र, मेडिकल इन्फॉर्मेशन मॅनेजमेंटपासून ते सामाजिक कार्यापर्यंत असे अनेक अभ्यासक्रम आहेत, जे वैद्यकीय क्षेत्राला पूरक आणि उपयुक्त आहेत. त्यामधील संशोधकांमध्ये विचारांची आणि संशोधनकार्याची देवाणघेवाण तसेच सहकार्य निर्माण व्हायला हवे. दोन्ही संस्थांतील विविध विषयतज्ज्ञांमध्ये संवाद प्रस्थापित झाला पाहिजे.

यावेळी विद्यापीठाच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. विनिता रानडे यांनी मागील पाच वर्षांतील सामंजस्य कराराच्या फलश्रुतीविषयी सविस्तर माहिती दिली. सामंजस्य करारावर शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास शिंदे आणि डी. वाय. पाटील शिक्षण संस्थेचे कुलसचिव डॉ. विश्वनाथ भोसले यांनी स्वाक्षरी केल्या. अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे संचालक डॉ. सागर डेळेकर यांनी स्वागत व प्रास्ताविक केले, तर डॉ. शिंदे यांनी आभार मानले. कार्यक्रमास शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, डी. वाय. पाटील शिक्षण संस्थेच्या अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाच्या संचालक डॉ. शिम्पा शर्मा, संशोधन संचालक डॉ. सी. डी. लोखंडे, अधिष्ठाता डॉ. राजेश कट्टाप्पा, वैद्यकीय अधीक्षक डॉ. वैशाली गायकवाड, उपकुलसचिव डॉ. संजय जाधव, विश्वजीत खोत, विनोद पोंडिज आदी उपस्थित होते.

पुण्यनगरी

# शिवाजी विद्यापीठाचे ८२७ निकाल जाहीर

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या उन्हाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या परीक्षा सुरू आहेत. सोमवारी बॅचलर ऑफ आर्किटेक्चर अभ्यासक्रमाची परीक्षा सहा केंद्रांवर झाली. त्यासाठी १५६ विद्यार्थी उपस्थित होते. दिवसभरात एका अभ्यासक्रमाचा निकाल जाहीर करण्यात आला, तर आजअखेर ८२७ अभ्यासक्रमांचे निकाल घोषित करण्यात आले.

पुढारी

# राज्यस्तरीय ॲथलेटिक्स कार्यशाळा

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

महाराष्ट्र राज्य ॲथलेटिक्स असोसिएशन, शिवाजी विद्यापीठ क्रीडा विभाग व डी. आर. के. कॉलेज ऑफ कॉमर्स यांच्या संयुक्त विद्यमानाने दोन दिवसीय राज्यस्तरीय ॲथलेटिक्स कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. शनिवार, दि. २६ व रविवार दि. २७ जुलै रोजी देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स येथे कार्यशाळा होईल.

कार्यशाळेत अथलेटिक्स खेळातील पंचांच्या कार्यक्षेत्रामध्ये बदलणाऱ्या नवीन नियम व अटींची माहिती, ॲथलेटिक्स खेळातील नियम व अटी आणि डोपिंगविषयी धोके जाणीव व जागृती याबाबतचे मार्गदर्शन होणार आहे. आंतरराष्ट्रीय पंच राखी सावंत व आंतरराष्ट्रीय प्रशिक्षक सुभाष पवार हे सहभागी पंच व खेळाडूंना मार्गदर्शन करणार असल्याची माहिती जिल्हा ॲथलेटिक्स असोसिएशनचे सचिव प्रकुल पाटील-मांगोरे यांनी पत्रकाद्वारे कळविली आहे.

सकाळ

A++" Accredited byNAAC

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## जाहीर निवेदन (विद्यार्थ्यांकरिता)

## नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 नुसार पदवी व पदव्युत्तर स्तरावर प्रथम वर्ष प्रवेशित विद्यार्थ्यांचे Academic Bank of Credit (ABC ID) काढणेबाबत जाहीर निवेदन

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 नुसार उच्चशिक्षण संस्थांमधील पदवी व पदव्युत्तर स्तरावरील अभ्यासक्रमांना शैक्षणिक वर्ष 2022–23 पासून प्रथम वर्षात प्रवेश घेतलेला आहे अशा विद्यार्थ्यांनी Academic Bank of Credit (ABC ID ) काढणे आवश्यक असून अनिवार्य आहे. याबाबत www.digiLocker.gov.in या संकेतस्थळावर सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

महाविद्यालय/अधिविभाग स्तरावर ABC ID नोंद करणेची सुविधा महाविद्यालय/अधिविभाग यांना उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. सदर नोंदी लवकरात लवकर पूर्ण करणेबाबत वेळोवेळी महाविद्यालय तसेच अधिविभाग यांना पत्राद्वारे कळविणेत आले आहे. यापूर्वी ABC ID नोंद न केलेल्या विद्यार्थ्यांना ABC ID नोंद करणेबाबत SMS पाठविण्यात आले आहेत. अद्यापही काही विद्यार्थ्यांनी ABC ID काढून महाविद्यालय/अधिविभाग यांना सादर केलेले नाहीत अशा विद्यार्थ्यांनी त्यांचे ABC ID काढून महाविद्यालय/अधिविभाग यांना सादर करावेत. त्यास अनुसरून राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 नुसार 100% ABC ID काढणेबाबत महाराष्ट्र शासनाच्या निर्देशानुसार अद्याप ज्या विद्यार्थ्यांनी ABC ID काढले नाहीत त्यांची यादी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर https://www.unishivaji.ac.in/uploads/suk/2025/July/22july/ABC%20ID%20pending%20Students%20List.pf ठेवण्यात आली आहे. तरी सर्व संबंधित विद्यार्थ्यांनी यादी पडताळून ABC ID काढून महाविद्यालय/अधिविभाग यांना सादर करावेत.

दि.23/07/2025

ठिकाण: कोल्हापूर

संचालक,

परीक्षा व मूल्यमापन मंडळ

पुढारी

A++"Accredited byNAAC

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## जाहीर निवेदन (विद्यार्थ्यांकरिता)

## नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 नुसार पदवी व पदव्युत्तर स्तरावर प्रथम वर्ष प्रवेशित विद्यार्थ्यांचे Academic Bank of Credit (ABC ID) काढणेबाबत जाहीर निवेदन

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 नुसार उच्चशिक्षण संस्थांमधील पदवी व पदव्युत्तर स्तरावरील अभ्यासक्रमांना शैक्षणिक वर्ष 2022–23 पासून प्रथम वर्षात प्रवेश घेतलेला आहे अशा विद्यार्थ्यांनी Academic Bank of Credit (ABC ID ) काढणे आवश्यक असून अनिवार्य आहे. याबाबत www.digiLocker.gov.in या संकेतस्थळावर सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

महाविद्यालय/अधिविभाग स्तरावर ABC ID नोंद करणेची सुविधा महाविद्यालय/अधिविभाग यांना उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. सदर नोंदी लवकरात लवकर पूर्ण करणेबाबत वेळोवेळी महाविद्यालय तसेच अधिविभाग यांना पत्राद्वारे कळविणेत आले आहे. यापूर्वी ABC ID नोंद न केलेल्या विद्यार्थ्यांना ABC ID नोंद करणेबाबत SMS पाठविण्यात आले आहेत. अद्यापही काही विद्यार्थ्यांनी ABC ID काढून महाविद्यालय/अधिविभाग यांना सादर केलेले नाहीत अशा विद्यार्थ्यांनी त्यांचे ABC ID काढून महाविद्यालय/अधिविभाग यांना सादर करावेत. त्यास अनुसरून राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 नुसार 100% ABC ID काढणेबाबत महाराष्ट्र शासनाच्या निर्देशानुसार अद्याप **ज्या विद्यार्थ्यांनी ABC ID काढले नाहीत त्यांची यादी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर https://www.unishivaji.ac.in/uploads/suk/2025/July/ 22july/ABC%20ID%20pending%20Students%20List.pf ठेवण्यात आली आहे.** तरी सर्व संबंधित विद्यार्थ्यांनी यादी पडताळून ABC ID काढून महाविद्यालय/अधिविभाग यांना सादर करावेत.

दि.23/07/2025

ठिकाण: कोल्हापूर

संचालक,

परीक्षा व मूल्यमापन मंडळ